

# ‘दंगल’ कुणासाठी : स्त्रीमुक्तीसाठी की राष्ट्रासाठी?

इनायत परदेशी

‘दंगल’ चित्रपटाचे ट्रेलर्स पाहताना त्यात स्त्रीवाद, स्त्रीभ्रूणहत्या, खाप पंचायत, ऑनर किलिंग याविषयी आणि त्या अनुषंगाने महिला कुस्तीपटूविषयी मांडणी असेल, असा सर्वसामान्य अंदाज वर्तविला जात होता. कारण चित्रपटात हरियाणातील महिला कुस्तीपटू गीता व बबिता फोगाट, त्यांचे पिता व प्रशिक्षक महावीरसिंग फोगाट यांच्या वाटचालीचे दर्शन घडणार अशी चर्चा मीडियात होती. हा चित्रपट कसा आहे, त्याचे आजच्या काळाशी संदर्भ काय आहेत, याचा थोडक्यात परामर्श हा लेख घेणार आहे.

चित्रपटात आमीर खान (महावीरसिंग फोगाट), साक्षी तंवर (महावीरसिंगची पत्नी व गीता-बबीताची आई-दया कौर), गिरीश कुलकर्णी (गीता-बबीताचे राष्ट्रीय क्रीडा अकादमी, पतियाला येथील प्रशिक्षक), अपारशक्ती खुराना (गीता-बबिताचा चुलतभाऊ) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. किशोरवयीन गीताची भूमिका झायरा वासिम या अभिनेत्रीने केली आहे, तर तरुण गीताची भूमिका फातिमा सना शेख या अभिनेत्रीने साकारली आहे. किशोरवयीन बबिताची भूमिका सुहानी भटनागर या अभिनेत्रीने, तर तरुण बबिताची भूमिका सान्या मल्होत्रा या अभिनेत्रीने साकारली आहे.

चित्रपटाच्या प्रारंभीच महावीर फोगाट यांची कुस्ती आहे. त्यामुळे पुरुषी बाहुबलाचे दर्शन प्रारंभीच चित्रपटाची पकड घेते. महावीर फोगाट हे कुस्तीचे राष्ट्रीय स्तरावरील विजेते राहिलेले असून कुस्तीत उपजीविकेचे साधन नसल्यामुळे त्यांना कुस्ती सोडून नोकरी पत्करावी लागते. भारताला आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आपला पुत्र प्राप्त करून देईल, या आशेने ते पुत्रजन्माची आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र त्यांना सलग चारीही कन्याच झाल्या आहेत. त्यामुळे महावीर फोगाट निराश आहेत.

ईमेल : pwatsaru@yahoo.com

'मुलगा नाही, तर देशासाठी सुवर्णपदक नाही' या समजात ते जगत आहेत. येथे पुत्रजन्माची आस ह्या संदर्भात पितृसत्ता–पुरुषसत्ता कार्यरत दिसते. पुत्रीजन्माचे स्वागत दिसत नाही. तसेच देशासाठी सुवर्णपदक ह्या आशावादात राष्ट्रवाद व तोसुद्धा स्पर्धेचा राष्ट्रवाद काम करताना दिसतो. या मानसिकतेचा सामाजिक संदर्भ आपल्याला महिला कुस्तीपटू/क्रीडापटू यांच्यावरील शासनाच्या खर्चाच्या तपशिलात वा प्रेक्षकांच्या या क्रीडापटूकडे बघण्याच्या दृष्टिकोनात सापडतो. पुरुष खेळाडूंपेक्षा अत्यंत कमी उत्तेजन व मानधन भारतात महिला खेळाडूंना मिळते. मूलतः 'स्त्रिया खेळू शकतात, राष्ट्राचे प्रतिनिधित्व/नेतृत्व करू शकतात' ही मानसिकताच पुरुषी राष्ट्रवाद विकसित होऊ देत नाही. 'राष्ट्राचा मुख्य प्रवाह पुरुषच' याचा प्रत्यय सार्वजनिक जीवनात वारंवार येतो. या पार्श्वभूमीवर कथानक थोडी कलाटणी घेते. गीता–बबिता काही टवाळ मुलांना मारहाण करतात. ही बातमी महावीर फोगाट यांना समजते व त्यांचा स्वतःच्या मुलींकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. गीता–बबिताच्या शारीरिक ताकतीने प्रभावित होऊन ते गीता–बबिताचे कुस्तीचे प्रशिक्षण सुरू करतात. या प्रशिक्षणात महावीर फोगाट व त्यांच्या मुली गीता–बबितावर समाजातून विशेषतः पुरुषांद्वारे लैंगिक व बीभत्स प्रतिक्रिया येतात. याचे चित्रण चित्रपट देतो. गीता–बबितास त्यांच्या शाळेतील मुलीही 'मर्द' म्हणून चिडवतात. यावरून हे लक्षात येते की, ग्रामीण स्त्रीभानही पुरुषी वर्चस्वग्रस्त आहे. मुलींनीच मुलींना 'मर्द' म्हणणे, हे कुस्तीपटू मुलींना पुरुषांशी स्पर्धा करण्यापासून रोखणारे आहे. त्यात 'स्त्रीत्वाच्या चौकटीतच राहा', असा इशारा गीता–बबितासाठी आहे.

या चित्रपटातील कथानकात स्त्रीमुक्तीवादास अधोरेखित करणारी घटना महत्त्वाची आहे. गीता–बबिताच्या 'बाप आम्हाला मुलींसारखे राहू देत नाही. पहिलवान बनवू पाहतो,' या तक्रारीला त्यांची बालवधू मैत्रीण उत्तर देते. ती म्हणते, 'तुमचा बाप तुमचा विचार तरी करतो. आमचा बाप मात्र आमच्या गुलामगिरीचा विचार करू शकत नाही. उलट जबाबदारी झटकत तो मला शोषणात ढकलत आहे.'' हा प्रसंग गीता–बबितास पुरुषसत्ताक स्त्रीभानाच्या विरुद्ध उभे करतो. येथे चित्रपट नवी गती घेतो. गीता–बबिता पुरुषसत्ताक स्त्रीभानावर मात करत कुस्तीची तयारी सुरु करतात. मात्र, ही तयारी पूर्णतः स्त्रीमुक्तीची ठरत नाही. कारण तिला राष्ट्रवादाचे लक्ष्य आहे. देशासाठी पदक मिळविणे हे अंतिम लक्ष्य आहे. त्या चौकटीतच चित्रपटातील स्त्रीमुक्तीचे संदर्भ आहेत. गीता–बबिताने स्वयंनिर्णय घेत स्वजीवनाची, जीवनसाथीची निवड करणे त्यात अपेक्षित नाही. तर वर्ज्यसुद्धा आहे.

**स्त्री खेळाडू आणि पुरुषी प्रेक्षकभान**

कुस्तीपटू मुलींच्या तोकड्या वस्त्रांवर पुरुषी लैंगिकता व्यक्त करणारी शेरेबाजी चित्रपट पुढे आणतो. परिधान करावयाचे कपडे व मुलींना उपलब्ध होणारी क्रीडाप्रकारांची संधी यांचा अन्योन्यसंबंध समाजातील पितृसत्तेच्या स्वरूपावर अवलंबून असतो. ग्रामीण समाजात स्त्रियांना कुस्तीचे स्वातंत्र्य नसते. मुलींचे समजले जाणारे खास असे काही खेळ (फुगडी, झिम्मा इ.) असतात. शारीरिक विशेषतः शरीराला शरीर भिडविण्याच्या क्रीडाप्रकारात मुली बहुतांश वेळा प्रेक्षकच राहतात.

गीता फोगाट (किशोरवयीन) जेव्हा तिची पहिली दंगल (कुस्तीस्पर्धा) खेळायला जाते, तेव्हा तिला स्पर्धेला महिला खेळाडू नसल्याने ती पुरुष खेळाडूशी कुस्ती लढणार हे स्पष्ट असते. कारण, जाटभूमीतील ती एकमेव महिला कुस्तीपटू आहे. समाजाचा रोष असूनही तिने व तिच्या पित्याने हे क्षेत्र निवडले आहे. दंगलचे प्रायोजक गीताला ती महिला असल्याचे कारण देत प्रारंभी तिचा प्रवेश नाकारतात. मात्र स्त्री विरुद्ध पुरुष कुस्ती असे भांडवली नफ्याचे गणित समजून येताच गीताला पुरुष खेळाडूशी लढण्याची मुभा देत प्रवेश दिला जातो.

या कुस्तीपूर्वी प्रायोजकांच्या संवादातून हे स्पष्ट होते की, भारतीय समाजात स्त्रीला भांडवलशाही स्पर्धेत प्रवेश देते. मात्र तिचा प्रवेश हा लैंगिकता व त्यावर आधारित मनोरंजन यांद्वारे ठरविला जातो. 'स्त्री विरुद्ध पुरुष' ही कुस्ती आणि त्यावर आलेल्या पुरुष प्रेक्षकांच्या बीभत्स, लैंगिक प्रतिक्रिया, त्याद्वारे वाढणारे कुस्तीच्या तिकिटाचे दर व गर्दी हे स्त्री खेळाडूस फक्त लैंगिक मनोरंजनकार ठरवतात. तिचा खेळ, तिचे डावपेच याकडे भारतीय प्रेक्षक लक्ष देत नाहीत. प्रेक्षकभान हे पुरुषभानात व पुढे आक्रमक लैंगिकतेत परिवर्तीत होते. भांडवली स्पर्धे तही स्त्री शोषितच ठरते. भारतात जात–पुरुषसत्ता–

भांडवलशाही या तिहेरी शोषणाची बळी स्त्री ठरते. आजही पी. व्ही. सिंधूची जात शोधली जाते. सानिया मिर्झाच्या खेळाकडे न पाहता तिचे कपडे व शरीर पहिले जाते. मौलवी सानिया मिर्झाविरुद्ध फतवा काढतात की, तिने स्कर्ट वापरू नयेत. हिजाब घालावा. झाकीर नाईकसारखा इस्लामिक विद्वान मौलवींच्या बाजूने त्यासाठी हिंदू व ख्रिस्ती धर्मग्रंथांचीही साक्ष देतो. सानिया मिर्झाने खेळताना कोणती वस्त्रे वापरावेत, हे ठरविण्यामागे 'स्वजमातीय स्त्री ही लैंगिकदृष्ट्या परजमातीय पुरुषाचे मनोरंजनाचे साधन बनू नये, हा विचार तर असतोच. मात्र आमच्या जमातीची/जातीची स्त्री ही आमची मालकी असून तिच्या लैंगिकतेवर आमच्या जमातीचा/जातीचा पुरुषच नियंत्रण ठेवेल' हा पुरुषसत्तावादी विचारही असतो. सानिया मिर्झा व तिच्याविषयीच्या यूट्यूब गॉसिपमधील काही प्रतिक्रिया अत्यंत बोलक्या होत्या. त्यात सानिया मिर्झा सरतेशेवटी मुस्लीम पुरुषाशीच विवाह करेल, असा आशावाद होता (वाचकांनी सानिया मिर्झाच्या गॉसिपविषयी यूट्यूबवर शोधावे). तसेच विजेत्या स्त्री-खेळाडूची जात शोधण्यात व तिचे प्रेमप्रकरण, गॉसिप शोधण्यात 'स्वजातीय/स्वधर्मीय स्त्री खेळाडूच्या लैंगिकतेचा मागोवा घेण्याची वृत्ती तर असतेच. मात्र तिच्या लैंगिक वर्तनावरील शक्यतांचा शोधही त्यामागे असतो. 'गुणवत्ता फक्त आमच्या जातीतच' असा जातीय अहंगंडसुद्धा त्यामागे असतो.

क्रीडाक्षेत्राशिवाय कॉर्पोरेट, आय.टी., सरकारी क्षेत्रांतही जात-लिंगभाव-भांडवलशाही आंतरछेदिततेने स्त्री-शोषण करतात. हिंजवडी आय.टी. हब असो की दिल्ली, यांतील स्त्रिया ह्या लैंगिक शोषणाच्या कुठे कुठे कमी अथवा जास्त प्रमाणात बळी असतात. दिल्लीत रात्रपाळी करणाऱ्या महिला नोकरदार लैंगिक शोषणाच्या बळी ठरताना आपल्या लक्षात आले आहे.

**जात-लिंगभाव आणि शोषणाचे स्वरूप**

'दंगल'मध्ये खाप पंचायतीचे चित्रण नाही. अन्यथा जाटांची चित्रपटाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटली असती. खाप पंचायत असूनही गीता-बबितास कुस्ती खेळण्याचे स्वातंत्र्य मिळते. मात्र त्यांना जीवनसाथीची निवड करण्याचे स्वातंत्र्य खाप नाकारते.' स्त्री-लैंगिकतेवर स्वजातीय निर्बंध, स्त्रियांनी स्वजातीसाठीच पुनरुत्पादन करावे' अशी भूमिका खाप वठविते. हरियाणाच्या जाट स्त्रिया कुस्तीपुरता सामाजिक स्वातंत्र्याचा अवकाश कुटुंबाच्या पाठबळाने व संरक्षणाने प्राप्त करतात. मात्र दलित-आदिवासी स्त्रिया शेतमजुरी वा गावकीच्या कामासाठी सक्तीने असहायतेने सार्वजनिक जीवनात वावरतात. त्यांच्या श्रमांची चोरी तर होतेच. मात्र त्या लैंगिक शोषणाच्या शिकारही लवकर होतात. तेथे जातिव्यवस्था पुरुषसत्ता-भांडवलशाही हातमिळवणी करतात. जातिव्यवस्थेने लादलेले सफाईचे काम (उदाहरणार्थ-कचरा वेचणाऱ्या स्त्रिया) ग्रामीण भाग व शहरांत दिसते. भांडवली अवकाशात त्यांना रोजगार व तुलनेने थोडे जास्त पैसे मिळतात. मात्र लैंगिक शोषणाच्या बळी ठरण्याची शक्यता त्यांच्या बाबतीत जास्त असते.

वाटसरू / युनिक पुस्तके मिळण्याचे ठिकाण

**डिस्काउंट बुक शॉप**
विजया बेकरी बसस्टॉपसमोर,
विद्यापीठ रोड, कोल्हापूर
संपर्क : संजय चिपरे,
भ्र. ७७४४८०१५०९

'वाटसरू' सातारा येथे

परिवर्तनाचा वाटसरू
द्वारा : **द युनिक ॲकॅडमी**
पहिला मजला, गुरूशिल्प
बिल्डिंग, बॉम्बे रेस्टॉरंट चौक,
सातारा-४११५००३.
दू. ०२१६२-२४४१९३.
भ्र. ८६२५९४६३९४

## चित्रपटातून पुढे येणारे चित्रण व संदेश

नकळतपणे चित्रपटातून असा संदेश पुढे येतो की, पुरुषाच्या पाठबळाविना स्त्रीची भांडवली व पुरुषी वर्चस्वाच्या क्षेत्रातील प्रवेश-आगेकूच अशक्यप्राय आहे. महावीर फोगाट यांच्याशिवाय गीता-बबिताचा कुस्तीतील प्रवेश, आंतरराष्ट्रीय विजेतेपद अशक्य असा संदेश नकळतपणे पुढे येतो. कारण, चित्रपटात महावीर फोगाट सदैव-समर्थपणे गीता-बबिताच्या पाठीशी असल्याचे चित्रण वारंवार येते.

## स्त्रीमुक्तीकडून राष्ट्रवादाकडे स्थानांतरण

'मुलींनी कुस्तीपटू बनावे. मात्र देशाला पदक देण्यासाठी बनावे' हा राष्ट्रवाद महावीर फोगाट यांच्या मनात कार्यरत दिसतो. राष्ट्रीय क्रीडा अकादमीतील गीताचे केस वाढविणे, तिला नजरेने पुरुष खेळाडूने कॉंप्लिमेंट देणे, याचे चित्रण त्यामुळेच चित्रपटात जास्त नाही. कारण, पुरुषी-जातीय राष्ट्रवादात गीता-बबितास देशासाठी कुस्ती खेळण्याचेच स्वातंत्र्य आहे. जीवनसाथी/प्रियकराची निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांना अजिबात नाही. हे वास्तव चित्रपटातील राष्ट्रवादाआड बाजूला पडते. गीताच्या जॉगिंग करतानाच्या दृश्यातील तिला कॉंप्लिमेंट देणारा पुरुष खेळाडू कोण, याची चर्चा त्यामुळेच होत नाही. भांडवली-राष्ट्रवादी स्पर्धेतला स्त्रीवाद हा गीताने राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवत राष्ट्रगीताने चित्रपट संपवितो. राष्ट्रीय क्रीडा अकादमीतील प्रशिक्षक व महावीर फोगाट यांच्यातील स्पर्धेमुळे गीता-बबिताच्या वाटचालीकडे दुर्लक्ष होते. पुढे चित्रपट राष्ट्रवादकेंद्री बनतो. चित्रपट असे सुचवितो की, स्त्रीमुक्तीची मुळे ही स्पर्धात्मक राष्ट्रवादातच आहेत व त्यासाठी कुटुंब आणि त्यातील पुरुषाच्या पाठबळाची आवश्यकता असते.

## क्रीडासंस्कृती आणि शासकीय धोरण

इ.स.२०१० च्या राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेनंतर हरियाना शासनाने विजेत्यांना बक्षिसे जाहीर केली. त्यापूर्वी हरियाना शासनाकडे क्रीडाधोरण नव्हते (संदर्भ- bhupendra yadav, haryanvi jats as indian sports icons,economic & political weekly,december 25,2010, pg.36). तसेच पूर्वीपासून क्रीडा मानसिकता, क्रीडा संस्कृतीसाठी भारतीय स्तरावर कुठेही प्रयत्न नव्हते व आजही फारसे नाहीत. 'दंगल' भारताच्या शैक्षणिक जगतातील क्रीडाधोरणावर टीका करतो. क्रीडा या विषयावर आर्थिक पाठबळ नसणे, या मुद्द्यावर तो लक्ष वेधतो. प्राथमिक शालेय स्तर ते उच्च शिक्षणातील क्रीडा स्तर यांच्या विकासाकडे धोरणकर्त्यांचे दुर्लक्ष आहे. क्रीडा प्रशिक्षणाचे विकसनशील संस्थाकरण झालेले नाही. असे संस्थाकरण नसल्याने क्रीडा क्षेत्र आर्थिकदृष्ट्या व प्रशिक्षणाच्या दृष्टीनेही कमकुवत आहे. या वास्तवाचा शिकार महावीर सिंग फोगाट आहे. भारतीय क्रीडा धोरणाच्या अमानुष कर्तृत्वहीनतेवर 'दंगल' बोट ठेवतो. महावीरसिंग मानधनाविना जगतो आणि मुलींना प्रशिक्षित करण्यासाठी नोकरीचाही राजीनामा देतो. यातून क्रीडाक्षेत्राप्रती धोरणकर्त्यांची कमालीची असंवेदनशीलता दिसून येते. ती 'दंगल' यशस्वीरीत्या अधोरेखीत करतो.

जेथे खाप, ऑनर किलिंग, स्त्रीभ्रूण हत्या आहे, तेथे क्रीडा संस्कृती, त्यात स्त्रियांना समान संधी देण्याचे धोरण उभारण्याची गरज शासनास वाटत नाही. भारतभर हीच स्थिती दिसून येते.

## हरियाणा व शारीरिक आक्रमकतेच्या खेळांचा संबंध

हरियाणा हे पंजाबला लागून असलेले उत्तर भारतीय राज्य आहे. मैदानी प्रदेश असल्याने पूर्वापार सैनिकी आक्रमणांना बळी पडलेले हे भौगोलिक क्षेत्र आहे. परिणामी, जनतेचे सैनिकीकरण जास्त आहे. हरियाणाचा सैन्यातील टक्काही जास्त आहे. ही सैनिकी आक्रमकता खेळातही दिसते. बॉक्सिंग, कुस्ती, शरीरसौष्ठव यांची लोकप्रियता म्हणूनच हरियाणात जास्त दिसते. हरियाणा हे शेतीप्रधान राज्य आहे. वाढती आर्थिक दुरवस्था, व्यक्तिगत स्तरावरील सांपत्तिक व शैक्षणिक प्रगतीतील अडथळे यातून हरियाणाचा क्रीडापटू मर्दानगीच्या शोधाकडे जातो. मनोज कुमार ह्या राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेतील बॉक्सिंगमधील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूने मुलाखतीत सांगितले की, ''व्यक्तिगत स्तरावरील संपत्तीचा अभाव आणि सामाजिक स्तरावर सोयी-सुविधांचा अभाव यातून मी खेळातील त्वेष साकारत पदक मिळवले.'' (संदर्भ- bhupendra yadav, haryanvi jats as indian sports icons,economic & political weekly, december 25,2010, pg.37).

**कुस्ती, आक्रमक राष्ट्रवाद आणि प्रेक्षकभान**

भारतीय राजकारणात सध्या उजवे वळण आहे. ते आक्रमक राष्ट्रवाद देणारे आहे. ते क्रीडा व चित्रपट यांतूनही दिसते. हा आक्रमक राष्ट्रवाद बाहुबलाचा आहे. तो चित्रपटांतूनही प्रकट होतो. सुलतान, दंगल या चित्रपटांतूनही याची प्रचिती येते. राष्ट्रावादासाठीच व्यक्तिमत्त्वविकास (मुलींना भारतासाठी पदक मिळविण्यासाठी कुस्तीपटू बनविणे) व्यक्तिमत्वाचे दुसऱ्या व्यक्तिमत्त्वावर प्रभुत्व आणि त्यास स्पर्धेची जोड (राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेतील कुस्त्यांचे वारंवार चित्रण) हे दंगलचे वैशिष्ट्य आहे. दंगलने प्रेक्षकमनावर ठसविलेली कुस्तीस्पर्धा ही निखळ स्पर्धा नसून राष्ट्रवादी-भांडवली स्पर्धा आहे. भारतीय समाजात राष्ट्रवाद हा परधर्म-परराष्ट्रद्वेष यांतून उभा आहे. त्याद्वारे व्यक्तिमत्त्वविकास व स्त्रीमुक्ती शक्य नाही.

गीताने सुवर्णपदक जिंकल्यावर बिलाली या हरियाणामधील तिच्या खेड्याचा उल्लेख चित्रपटात येतो. येथे चित्रपट बेमालूमपणे राष्ट्रवादाची स्थानिकतेशी सांगड घालतो. आमीर खानचे वारंवार देश के लिये मेडल, देश का नाम रोशन' हे उद्‌गार राष्ट्रवादशरण स्त्रीमुक्ती सुचवितात. खेळातील राष्ट्रवाद हा स्वराष्ट्राप्रती मित्रभाव आणि प्रतिस्पर्धी राष्ट्र/खेळाडूंप्रती शत्रुभाव जोपासतो. त्याची प्रचिती गीता विरुद्ध तिच्या प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या कुस्तीतून येते. प्रेक्षक गीतामध्ये स्वराष्ट्र पाहतो. याउलट प्रतिस्पर्धी खेळाडूत विरोधी राष्ट्र पाहतो. गीताला मिळणारे प्रोत्साहन हे प्रतिस्पर्धी खेळाडू/राष्ट्राप्रती द्वेषात रूपांतरित होते. स्पर्धा निखळ स्पर्धा न राहता राष्ट्रवाद आणि परराष्ट्रविद्वेषी राष्ट्रवादात रूपांतरीत होते. व्यवस्थेने थकविलेल्या भारतीय प्रेक्षकाला ते हवेहवेसे वाटते. कारण व्यक्तिगत, सामाजिक जीवनात भारतीय प्रेक्षक वैफल्यग्रस्त आहे. त्यामुळे तो 'स्व'चे राष्ट्रवादात विलीनीकरण करतो. हेच 'दंगल' बघणाऱ्या प्रेक्षकांचेही घडते. प्रेक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोपन घडते. पारंपरिक समाजात जात, धर्म, कुटुंब, नातेसंबंध, प्रदेश यांच्या निष्ठा दैनंदिन जीवनात प्रबळ असतात. या निष्ठांच्या प्रभावक्षमता लक्षात घेऊन नव्या काळात राष्ट्र, राष्ट्रवाद यांचा दबदबा वाढता ठेवण्याची जबाबदारी राज्यकर्त्यावर असते. राज्यकर्ते स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी त्यांचा वापर करतात. 'देश के लिये' हा संदेश 'दंगल' वारंवार देतो. समाजात लोकशाही, स्वातंत्र्य, समता ही मूल्ये कमजोर असताना राष्ट्रबळकट करण्याची घोषणा व्यक्तिविकास आणि स्वातंत्र्य यांना घातक ठरू शकते. 'दंगल'मध्ये राष्ट्रवादाचा अनाठायी आवाज म्हणूनच चुकीचा वाटतो. वित्तीय हुकूमशाहीच्या काळात बँकेपुढे निमूटपणे आठ-आठ तास रांगेत उभ्या राहणाऱ्यांच्या गौरवार्थ शासनकर्ते उद्‌गार काढतात.त्यास आदर्श सैनिक ठरविले जाते. रांगेत मरणाऱ्यांना हुतात्मा म्हटले जाते.' विरोधक पाकिस्तानी सैन्यासारखे आहेत' असे राज्यकर्ते म्हणतात. अशा बिकट स्थितीत राष्ट्रवादाच्या मर्यादाही 'दंगल'ने दाखविणे आवश्यक होते.

●

**देशाच्या राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात प्रादेशिक राजकारण हा एक मध्यवर्ती घटक असतो आणि म्हणून प्रादेशिक पातळीवरील राजकारणाचे आकृतिबंध पाहावे आणि समजून घ्यावे लागतात ह्या भूमिकेतून ह्या पुस्तकातील राज्यनिहाय प्रकरणे मांडली आहेत. प्रादेशिक राजकारण ही जर भारतीय राजकारणाच्या अभ्यासाची एक उपशाखा मानली तर हे पुस्तक त्या उपशाखेच्या मराठीमधील अभ्यासाची सुरुवात आहे असे म्हणता येईल.**




**देश-प्रदेश**

*(प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा)*

**सुहास पळशीकर**

पाने : २५६ । किं. : ३०० रु.

The UNIQUE academy

**द युनिक ॲकॅडमी**

वास्तू चेंबर्स, शिरोळे रोड, फर्ग्युसन कॉलेजसमोर,
पुणे ४११००४. दू. ०२०२५५३०९५०